राठोडांवर विरोधकांचे 'बाणास्त्र'

वनमंत्र्यांच्या शक्तीप्रदर्शनावर टीकेचा डोस

नागपूर. पूजा चव्हाण आत्महत्या प्रकरणानंतर गेल्या 16 दिवसांपासून 'नॉट रिचेबल' असलेले वनमंत्री संजय राठोड पोहरादेवी गडावर प्रकटताच विरोधकांनी तीव्र शब्दात 'बाणास्त्र' सोडून नामोहरम करण्याचा प्रयत्न केला. एकीकडे पोहरादेवीत राठोड यांचे शक्तीप्रदर्शन होत असताना दुसरीकडे राज्याच्या राजधानीत मात्र विरोधकांनी टीकेचा भडिमार करून महाविकास आघाडीवरच शरसंधान केले. मुख्यमंत्र्यांच्या आदेशाची अवहेलना करत झालेल्या शक्तीप्रदर्शनामुळे तसेच राठोड यांच्यावरील गंभीर आरोपामुळे प्रमुख विरोधी पक्ष भाजपा अधिकच आक्रमक झाला असल्याचेही दिसून आले. विरोधकांच्या टीकेला शिवसेनेने राठोड यांनी कोणाला निमंत्रण दिले नव्हते, जबाबदारी पाळणे प्रत्येकाचेच काम होते, अशा शब्दात विरोधकांची हवा काढून घेण्यासह 'हात'वर करण्याचाही प्रयत्न केला.

मुख्यमंत्र्यांसाठी आव्हान

वनमंत्री संजय राठोड यांचे हे शक्तिप्रदर्शन नसून त्यांनी एकप्रकारे मुख्यमंत्र्यांना दिलेले आव्हानच आहे. मुख्यमंत्र्यांच्या आवाहनाला त्यांनी भीक घातलेली नाही. त्यांच्या आवाहनाला केराची टोपली दाखवली आहे. त्यामुळे हे शक्तीप्रदर्शन नसून मुख्यमंत्र्यांसाठी आव्हान प्रदर्शन आहे.

- **सुधीर मुनगंटीवार,** भाजपा नेते

पाठिशी घालण्याचा प्रयत्न?

एवढे दिवस झाले तरी पूजा चव्हाण प्रकरणात गुन्हा दाखल झालेला नाही. त्यामुळे या प्रकरणात दबाव आणला जात आहे का? मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे संजय राठोड यांना पाठीशी घालत आहे का? असा प्रश्न पडतो. हे सर्व अनाकलनीय व घृणास्पद असून दोषारोप सिद्ध होईपर्यंत त्यांनी राजीनामा देणे अपेक्षित आहे.

- **प्रवीण दरेकर,** विरोधी पक्षनेते, विधान परिषद

मुसक्या आवळून चौकशी करा

स्त्रियांवर अत्याचार किंवा त्यांना त्रास देणाऱ्या आरोपीला कुठलीही जात नसते. त्यामुळे शिवसेना नेते संजय राठोड यांच्या मुसक्या आवळून त्यांची चौकशी झाली पाहिजे. संजय राठोड ज्या समाजाचे आहेत पूजा चव्हाणही त्याच समाजातील होती. आमच्या लेखी जातीला महत्त्व नाही. बंजारा समाजातील अनेक नेते मला फोन करून याप्रकरणाची चौकशी झालीच पाहिजे, आम्ही तुमच्या पाठिशी आहोत, असे सांगत आहे.

- चित्रा वाघ, भाजप नेत्या

मुख्यमंत्र्यांची मूकसंमती

पूजा चव्हाण मृत्यूप्रकरणी इतके दिवस नॉट रिचेबल असलेले संजय राठोड आज अचानक प्रकट झाले. राज्याच्या एका मंत्र्यावर गंभीर आरोप आहेत. त्यासंबंधीचे अनेक पुरावे देखील समोर आले आहेत. तरीसुद्धा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे काहीच बोलत नाहीत. याचा अर्थ पूजा चव्हाण मृत्यूप्रकरणी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची संजय राठोड यांना मूकसंमती आहे हे दिसून येते.

- **आशिष शेलार,** भाजप नेते

'पूजा' पावेल तरी कशी ?

पोहरादेवीची पूजा तरी कशी पावेल जर चव्हाणच्या पूजाच काय झाले ते सांगितले नाहीत तर? युवतीच्या मृत्यूप्रकरणात नाव आलेले मंत्री 15 दिवस गायब होतात. मुख्यमंत्री गप्प. मात्र, मुख्यमंत्र्यांच्या आदेशाला हरताळ फासत हे मंत्री सोशल डिस्टनसिंगचा फज्जा उडवत शक्तिप्रदर्शन करतात. सत्तेची अपरिहार्यता असू शकेल. मुख्यमंत्री किमान करोनाचे नियम मोडल्याचा गुन्हा दाखल तरी करणार का?

- **केशव उपाध्ये,** भाजपा

सीबीआय चौकशी करा

राठोड यांचे स्पष्टीकरण नसून थोतांड आहे. ज्या पक्षाचे ते मंत्री आहेत आणि त्याच पक्षाचे सरकार असल्यामुळे निष्पक्ष चौकशी होईल ही अपेक्षा ठेवावी तरी कशी? जर संजय राठोड निर्दोष असतील तर त्यांनी सीबीआय चौकशीला सामोरे जावे.

- **प्रसाद लाड,** आमदार भाजपा

मंत्र्यांना सर्वच माफ

शिवजयंतीला शिवनेरीवर 144 कलम लावणारे ठाकरे सरकारला पूजा चव्हाण आत्महत्या प्रकरणी संशयाच्या घेऱ्यात असलेले संजय राठोड अचानक बिळातून बाहेर आले आणि गर्दी करून फिरले त्यावेळी महाभकास आघाडीला कोरोनाची भिती वाटली नाही... ठाकरे सरकारच्या मंत्र्यांना सगळं माफ आहे.

- **नीलेश राणे,** भाजपा नेते

भेदरलेल्या सरपंचासारखी अवस्था

निर्लज्जपणा आणि बेशरमपणाचा कळस काय असू शकतो हे संजय राठोड यांच्या वक्तव्यावरून दिसून येत होतं. राठोड यांची आजची अवस्था म्हणजे भेदरलेल्या सरपंचासारखी झाली. त्यांनी एकाही प्रश्नचं उत्तर दिलं नाही. फक्त समाजाच्या नावावर भावनिक शब्द बोलून ते निघून गेले. राठोड यांना तत्काळ अटक झाली पाहिजे, आणि त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे.

- **अतुल भातखळकर,** भाजपा नेते

विषय संवेदनशील

मुख्यमंत्र्यांच्या आदेशाचं पालन ही प्रत्येकाची जबाबदारी आहेच, खासकरुन मंत्र्यांची आहे. मी म्हणेन मीडियाही तुफान तिकडे गेला होता. कौटुंबीक दर्शन जे होतं, त्याला वेगळं स्वरुप होतं. परंतु ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. मुख्यमंत्र्यांनी म्हटलंय मीच जबाबदार, त्यामुळे ही प्रत्येकाने जबाबदारी उचलायला हवी. पण हा वेगळा विषय त्यांच्या जीवनातला होता. त्यामुळे संजय राठोड त्यांच्या कुटुंबासोबत तिथे दर्शनाला गेले.

मनीषा कायंदे, आमदार, शिवसेना

तपास योग्य पद्धतीने

संजय राठोड यांनी जी भूमिका मांडली आहे. तीच भूमिका आम्ही सांगत आहोत. पूजा चव्हाण आत्महत्याप्रकरणी पोलीस तपास करत आहे. तो तपास योग्य पद्धतीने होईल. यासाठी मीडिया ट्रायलची गरज नाही.

नाना पटोले, प्रदेशाध्यक्ष, काँग्रेस

सांगली महापालिकेत भाजपाचा पराभव

राष्ट्रवादीचा महापौर तर उपमहापौर काँग्रेसचा

सांगली. भाजपाच्या नगरसेवकांनी भाजपला कात्रजचा घाट दाखवत राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या गळ्यात महापौरपदाची माळ घातली आहे. यामुळे सत्ताधारी भाजपाला महापालिकेतील सत्ता गमवावी लागली. तुलनेने संख्याबळ कमी असताना देखील राष्ट्रवादीने भाजपाचा करेक्ट कार्यक्रम करत महापौर पद आपल्या पदरात पाडून घेतले आहे. सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगर पालिकेच्या महापौर आणि उपमहापौर निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसने बाजी मारली आहे. शेवटच्या क्षणापर्यंत सस्पेंस राहिलेल्या या निवडणुकीत भाजपची सत्ता अखेर संपुष्टात आणत राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीने महापौर आणि उपमहापौर पद भाजपाकडून हिसकावून घेतले. भाजपाचे उपमहापौर पदाचे उमेदवार गजानन मगदूम यांना पराभव स्वीकारावा लागला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार उमेश पाटील या ठिकाणी उपमहापौर म्हणून विजयी झाले आहेत.

आघाडीच्या उमेदवारांना मतदान

ऑनलाइन पद्धतीने पार पडलेल्या या निवडणुकीमध्ये नाराज असलेल्या भाजपच्या चार नगरसेवकांनी थेट राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीच्या उमेदवारांना मतदान केले आहे. त्यामुळे भाजपाचे महापौर पदाचे उमेदवार धीरज सूर्यवंशी यांचा पराभव झाला. राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार दिग्विजय सूर्यवंशी हे महापौरपदी विजयी झाले आहेत. भाजपाच्या 5 नगरसेवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीला या निवडणुकीत मतदान केले.

जयंत पाटलांचे धोबीपछाड

सांगली महापालिकेमध्ये गेल्या अडीच वर्षांपासून भाजपची सत्ता आहे. 41 अधिक दोन अपक्ष असे संख्याबळ असल्याने भाजपाने पुन्हा विजयाचा दावा केला होता. मात्र, भाजपामध्ये अंतर्गत नाराजी उफाळून आली होती. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयंत पाटील यांनी काँग्रेससोबत नाराज भाजपा नगरसेवकांना आपल्या गळाला लावले होते.

QUICK NEWS

औरंगाबादमध्ये रात्रीची संचारबंदी

औरंगाबाद. राज्यात कोरोना रुग्णांची झपाट्याने वाढ होत असल्यामुळे अनेक शहरात निर्बंध कडक करण्यात आलेले आहेत. औरंगाबाद शहरातही मंगळवारपासून रात्रीची संचारबंदी लागू करण्यात आली. रात्री 11 ते सकाळी 6 वाजेपर्यंत ही संचारबंदी असेल. 14 मार्च पर्यंत हा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी आयोजित केलेल्या बैठकीत पोलिस आयुक्त, मनपा आयुक्त यांच्याशी सल्लामसलत केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. संचारबंदीतून जीवनावश्यक वस्तू, उद्योग, कर्मचारी यांना वगळण्यात आले आहे. पुढील टप्प्यात आठवडी बाजार आणि भाजीमंडई बाबत निर्णय होणार असल्याची माहिती आहे. दरम्यान, जिल्ह्यात सध्या 941 रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

इम्तियाज जलील कोरोना पॉझिटिव्ह

एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष व औरंगाबादचे खासदार इम्तियाज जलील यांचा कोरोना अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. तीन दिवसांपूर्वी त्यांनी आपली चाचणी केली होती. औरंगाबादच्या खासगी रुग्णालयात उपचार घेत असल्याची माहिती इम्तियाज जलील यांनी ट्विटरद्वारे दिली आहे. इम्तियाज जलील हे गुजरात राज्यातील महानगरपालिका निवडणूक प्रचारासाठी गेले होते.

पोलिसांवर दगडफेक करणाऱ्या आरोपींची धिंड

नाशिक. शिवजयंतीला पोलिसांवर दगडफेक करणाऱ्या आरोपींची नाशिकमधील देवळाली परिसरात धिंड काढण्यात आली. याच परिसरात शिवजयंतीच्या रात्री पोलिसांवर दगडफेक झाली होती. या घटनेत दोन पोलिस कर्मचारी जखमी झाले होते. याप्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. अटकेतील आरोपींची नाशिकमधील देवळाली परिसरात धिंड काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्ताने देवळाली पोलिस हद्दीत कर्तव्यावर असताना संसरी येथील चारणवाडी येथील एका इसमाबरोबर भांडण होऊन ते पोलिस ठाण्यात तक्रार देण्यासाठी आले.

राज्यस्तरीय शुल्क नियंत्रण समितीची स्थापना

पालकांच्या तक्रारी सोडविणार

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क

मुंबई. शाळांच्या फीवाढीविरोधातील पालकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने येत्या आठवडाभरात राज्यस्तरीय व विभागीय शुल्क नियंत्रण समिती स्थापन करण्याची घोषणा केली आहे. या समित्यांकडे पालक शाळेविरोधात तक्रार करू शकतात, असे शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी स्पष्ट केले. कोरोना काळात पालकांकडून ज्यादा शालेय फी वसुलीविषयी तोडगा काढण्यासाठी पालक संघटनांसोबत वर्षा गायकवाड यांची बैठक पार पडली. मात्र या बैठकीत शालेय फीविषयी कोणताही ठोस निर्णय झाला नसल्याचा आरोप पालक प्रतिनिधींनी केला आहे.

फी वाढीबाबत पालकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश आणि शालेय शिक्षण विभागाच्या अपर मुख्य सचिव येत्या आठवड्यात समिती स्थापन करणार असल्याचे वर्षा गायकवाड यांनी सांगितले. शिक्षण सहसचिव इम्तियाज काझी, बालभारतीचे संचालक दिनकर पाटील, सहसचिव विधी गोपाल तुंगार, सहसंचालक, प्राथमिक शिक्षण दिनकर टेमकर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) बी. बी. चव्हाण, शिक्षण उपनिरीक्षक रझाक नाईकवाडे, वरिष्ठ लेखा परीक्षक सोलापूर दयानंद कोकरे, शिक्षण अधीक्षक श्रीधर शिंत्रे हे समितीत असणार आहेत. ऑनलाइन शाळा सुरू असताना वापरण्यात न येणाऱ्या सुविधांचे शुल्क आकारणाऱ्या, शुल्कासाठी पालकांमागे लागणाऱ्या, विद्यार्थ्यांना ऑनलाइन वर्गातून काढून टाकणाऱ्या शाळांची शिक्षणाधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात येईल. त्याचप्रमाणे विभागीय शुल्क नियमन समित्यांवर आठवड्याभरात नियुक्त्या करण्यात येतील,

अशोक चव्हाणांचा सरकारवर निशाणा

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क

मुंबई. सध्या सुरू असलेल्या पेट्रोल- डिझेलच्या दर वाढीमुळे सर्वसामान्य जनता मेटाकुटीस आलेली आहे. तर, या मुद्यावरून विरोधी पक्ष आक्रमक झाले असून मोदी सरकारवर सातत्याने टीका केली जात आहे. राज्यात पेट्रोलचे दर शतकाच्या उंबरठ्यावर आहेत. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते व राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री अशोक चव्हाण यांनी मोदी सरकारवर निशाणा साधला आहे. महाराष्ट्रात पेट्रोलचे दर शतकाच्या उंबरठ्यावर आहेत. कुणीतरी खरच म्हटलं आहे, हवाई चप्पल घालणाऱ्यांना विमान यात्रा घडवण्याची स्वप्न दाखवणाऱ्यांनी दुचाकी यात्रेच्याही लायक ठेवलं नाही, असे चव्हाण यांनी ट्विट केले आहे. तसेच, या ट्विटसोबत त्यांनी परभणीतील 99.43 रुपये प्रति लिटर हा पेट्रोलचा दर देखील दर्शवला आहे. या अगोदर देखील पेट्रोल व डिझेलच्या दर वाढीवरून चव्हाण यांनी केंद्र सरकारवर जोरदार तोफ डागलेली आहे. 'भारताच्या इतिहासात जे कधीही घडले नाही, ते आता मोदी सरकारच्या कारकिर्दीत घडणार असल्याचे दिसते आहे अशी टीका त्यांनी केली होती.

चंद्रकांत पाटील यांचा आघाडी सरकारला टोमणा

केंद्रावर खापर फोडू नका

मुंबई. केंद्रीय अर्थमंत्रालयाने महाराष्ट्राला जीएसटीचे 11 हजार 519.31 कोटी दिले आहेत. त्यामुळे आता तरी महाविकास आघाडी सरकारने ही रक्कम कोविडच्या उपाययोजना आणि राज्यातील विकास कामांना गती देण्यासाठी वापरावी. प्रत्येक गोष्टींचं खापर केंद्र सरकारवर फोडणे बंद करावे, असा टोमणा भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी हाणला. केंद्र सरकारकडून महाराष्ट्राला जीएसटीच्या थकबाकीपोटी 27 हजार कोटी येणे बाकी आहे, त्यामुळे त्याचा परिणाम यंदाचा राज्याच्या अर्थसंकल्पावर होईल, असा दावा उपमुख्यमंत्री अजित पवार नुकताच केला होता. प्रत्येक वेळी केंद्र सरकारवर खापर फोडायचे आणि जीएसटीच्या थकबाकीचे कारण सांगून आपली जबाबदारी केंद्रावर ढकलण्याचे काम नेहमीच महाविकास आघाडी सरकार करीत आहे, असाही आरोप पाटील यांनी केला.

> गेल्याच आठवड्यात केंद्रीय अर्थ मंत्रालयाने गेल्या 4 महिन्यात म्हणजे ऑक्टोबर 2020 पासून राज्य व केंद्र शासित प्रदेशांना जीएसटीच्या पोटी 1 लाख कोटी रुपये वितरित केले आहेत. अर्थ मंत्रालयाने देशातील 28 राज्ये व तीन केंद्र शासित प्रदेशांना जीएसटी परताव्याची रक्कम वितरित केली आहे. त्यापैकी महाराष्ट्राला मिळालेली जीएसटीची रक्कम ही दुसऱ्या क्रमांकाची आहे. त्याचप्रमाणे 2019-20 मध्ये केंद्र सरकारकडून महाराष्ट्र राज्याला सर्वाधिक जीएसटी परताव्याची रक्कम 19 हजार 233 कोटी देण्यात आली आहे.
>
> - **चंद्रकांत पाटील,** प्रदेशाध्यक्ष, भाजपा

सत्तारांचे 'एकला चलो रे...'

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क

औरंगाबाद. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीसाठी ताकदपणाला लावून बँक ताब्यात घेण्यासाठी मैदानात उतरलेल्या राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांनी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी तिसरा अर्ज दाखल केला. सत्तार यांनी यापूर्वी दोन अर्ज दाखल केले होते, तर सोमवारी तीन अर्ज दाखल केले असे एकूण पाच अर्ज सत्तार यांनी या औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी दाखल केले आहे. त्यांचा मुलगा समीर सत्तार यांनीही तीन अर्ज निवडणुकीसाठी दाखल केले आहेत. महाविकास आघाडीमध्ये मंत्री असलेले अब्दुल सत्तार यांनी जिल्हा बँकेत मात्र महाविकास आघाडी सोबत न जाण्याचा निर्णय घेतला आहे.

स्वतंत्र पॅनल उभारणार

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीविरुद्ध भाजप असे चित्र असताना सत्तार यांनी महाविकास आघाडीसह भाजपलाही चकवा देत स्वतंत्र पॅनल उभे करण्याची तयारी सुरू केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. भाजपतर्फे आमदार हरिभाऊ बागडे यांच्या नेतृत्वाखाली दोन बैठका बँकेच्या बिनविरोध निवडणुकीसाठी झालेल्या या बैठकीतही सत्तार यांनी दांडी मारली. यासह सत्तेत असलेल्या तिन्ही पक्षांतील उमेदवारांनी एकत्र येत अर्ज दाखल केली. त्यावेळीही सत्तार यांनी दांडी मारली होती. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत सत्तारांची नवी खेळी बघायला मिळणार आहे.

मुंबई—गोवा महामार्गाचे काम रखडले

मुंबई. मुंबई—गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम मार्च 2021पर्यंत पूर्ण करणार, अशी कोर्टाला हमी देऊनही संथगतीने या मार्गाचे काम सुरू असल्याने मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. सुमारे 700 किमी लांबीच्या समृद्धी महामार्गाचे काम सुसाट सुरू असून मुंबई—गोवा महामार्गाचे चौपदरीकरण मात्र गेल्या दहा वर्षांपासून रखडल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला आहे. याप्रकरणी मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांच्या खंडपीठासमोर 3 मार्च रोजी सुनावणी होणार आहे. या महामार्ग क्र. 66वर पडलेले खड्डे, खड्यांमुळे झालेल्या वाताहतीमुळे अॅड. पेचकर यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

पक्षाला मिळाला 59.94 कोटींचा निधी

राष्ट्रवादीच्या गंगाजळीत 5 पट वाढ

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क

मुंबई. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येताच राष्ट्रवादी काँग्रेस राज्यात वरचढ होत असल्याचे दिसून येत आहे. सत्तेत महत्त्वाची खाती पटकावणाऱ्या राष्ट्रवादीच्या गंगाजळीतही पाच पट वाढ झाल्याचे गेल्या आर्थिक वर्षात दिसून आले. आर्थिक वर्ष 2019-20 मध्ये राष्ट्रवादीला 59.94 कोटीचा निधी मिळाला होता. गेल्या वर्षी हा निधी 12.05 कोटी रुपये होता. राष्ट्रवादी काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे पक्षाच्या योगदानाचा अहवाल सादर केला आहे. प्रत्येक वर्षी राजकीय पक्षांना त्यांच्या 20,000 रुपयांच्या योगदानाची माहिती निवडणूक आयोगाला द्यावी लागते. त्यातून ही माहिती उजेडात आली आहे. यापूर्वी काँग्रेस आणि राष्ट्रवादीची आघाडी होती. हे दोन्ही पक्ष राज्यात ऑक्टोबर 1999 ते ऑक्टोबर 2014 पर्यंत सत्तेत होते. त्यानंतर भाजपचे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले. शिवसेनेच्या मदतीने फडणवीस सत्तेत आले.

---

kotak® | कोटक महिंद्र बँक लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : २७बीकेसी, सी – २७, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पू.), मुंबई – ४०० ०५१.
शाखा कार्यालय : ४ था मजला, नियती युनिट्री, गुंजन थिएटर्सजवळ, झोन २, येरवडा, पुणे – ४११ ००६.

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)

(सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या परिशिष्ट ४ सहवाचन नियम ८ (१) अंतर्गत)

ज्याअर्थी, अधोहस्ताक्षरित – प्राधिकृत अधिकारी – **कोटक महिंद्र बँक लिमिटेड** – बँकिंग विनियमन कायदा, १९४९ च्या व्याख्येअंतर्गत एक कंपनी, त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता २७बीकेसी, सी २७, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू.), मुंबई – ४०० ०५१ व शाखा कार्यालयाचा पत्ता : ४ था मजला, नियती युनिट्री, गुंजन थिएटर्सजवळ, झोन २, येरवडा, पुणे – ४११ ००६ यांनी सीक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ **(सरफैसी कायदा)** अंतर्गत व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे अनुच्छेद १३ (२) व १३ (१२) सहवाचन नियम ८ (१) अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून सूचनेत निर्देशित थकित रक्कम दि. ३१.०७.२०१९ रोजीनुसार **रु. १,०४,५४,४६७.९७ (रु. एक कोटी चार लाख चोपन्न हजार चारशे सदुसष्ट व सत्त्याण्णव पैसे मात्र)** व त्यावरील दि. **०१.०८.२०१९** पासून वास्तविक वसुलीच्या (थकित रक्कम) तारखेपर्यंत पुढील व्याज व अन्य व्याज, चक्रवाढव्याज दराने पुढील व्याज रकमेचे प्रदान संबंधित सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्यासाठी मागणी सूचना दि. ३१.०७.२०१९ पाठवली होती जी **१. सीमा चितलंग्य (कर्जदार) पत्ता** : फ्लॅट क्र. जी – १२०४, ट्रेजर पार्क, संतर नगर, तळवलकर जिम, पर्वती, पुणे – ४११ ००९, तसेच अन्य पत्ता : ६०१, ६ वा मजला, विंग जी, ट्रेजर पार्क, सर्व्हे क्र. ६१, सीटीएस क्र. ३४४६, सहकार नगर, पर्वती, पुणे – ४११ ००९, २. **श्री. गोविंद चितल्यंग (सहकर्जदार) पत्ता** : फ्लॅट क्र. जी – १२०४, ट्रेजर पार्क, संतर नगर, तळवलकर जिम, पर्वती, पुणे – ४११ ००९, तसेच अन्य पत्ता : ६०१, ६ वा मजला, विंग जी, ट्रेजर पार्क, सर्व्हे क्र. ६१, सीटीएस क्र. ३४४६, सहकार नगर, पर्वती, पुणे – ४११ ००९या पत्त्यावर पाठवण्यात आली होती. वरील निर्देशित कर्जदार/सहकर्जदार यांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना ही वरील निर्देशित कर्जदार, सहकर्जदार वर उल्लेखित केल्यानुसार गहाणवटदार यांना व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी सरफैसी कायद्याचे अनुच्छेद १३ (४) सहवाचन सदर नियमाच्या नियम ८ अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा खालील निर्देशित मालमत्तेचा दि. **२२.०२.२०२१** रोजी **ताबा** घेतला आहे.

विशेषत: वरील निर्देशित कर्जदार/सहकर्जदारांना व आम जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार **कोटक महिंद्र बँक लि.** त्यांच्या शाखेचा पत्ता : ४ था मजला, नियती युनिट्री, गुंजन थिएटर्सजवळ, झोन २, येरवडा, पुणे – ४११ ००६ यांच्या नमूद प्रभाराअंतर्गत थकित रक्कम दि. ३१.०७.२०१९ रोजीनुसार **रु. १,०४,५४,४६७.९७ (रु. एक कोटी चार लाख चोपन्न हजार चारशे सदुसष्ट व सत्त्याण्णव पैसे मात्र)** व त्यावरील दि. **०१.०८.२०१९** पासून संपूर्णी४ प्रदान व/वा वसुलीच्या तारखेपर्यंत पुढील व्याज व अन्य व्याज, चक्रवाढव्याज दराने पुढील व्याज तसेच प्रासंगिक खर्च, मूल्य व प्रभार आदी रकमेच्या अधीन असतील.

कायद्याच्या अनुच्छेद १३ च्या उपअनुच्छेद ८ च्या तरतुदींअंतर्गत कर्जदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे की त्यांनी उपलब्ध वेळेमध्ये प्रतिभूत मालमत्ता सोडवून घ्यावी.

स्थावर मालमत्तेचे विवरण

पुढील विवरणीत मालमत्तेचा सर्व तो भाग व भूखंड :

फ्लॅट क्र. ६०१, ६ वा मजला, विंग जी, ट्रेजर पार्क, सर्व्हे क्र. ६१, सीटीएस क्र. ३४४६, सहकार नगर, पर्वती, पुणे – ४११ ००९.

दिनांक : २२.०२.२०२१
ठिकाण : पुणे

सही/–
प्राधिकृत अधिकारी, कोटक महिंद्र बँक लि.

फॉर्म ए
जाहीर उद्घोषणा

(इन्सोल्हेन्सी अँड बँकरप्ट्सी बोर्ड ऑफ इंडिया (स्वैच्छिक परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अंतर्गत)

लीला ट्रेड स्टील अँड कमॉडिटीज इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधून घेण्यासाठी

संलग्न तपशील

१.	कॉर्पोरेट ऋणकोचे नाव	लीला ट्रेड स्टील अँड कमॉडिटीज इंडिया प्रायव्हेट लिमिटेड
२.	कॉर्पोरेट ऋणकोची संस्थापन दिनांक	१८.०४.२००५
३.	प्राधिकारी ज्यांच्याअंतर्गत कॉर्पोरेट व्यक्ती संस्थापित/नोंदणीकृत आहे	कंपन्या निबंधक (आरओसी) : पुणे महाराष्ट्र यांच्या अंतर्गत कंपन्या कायदा, १९५६ अंतर्गत संस्थापित कंपनी
४.	कॉर्पोरेट ऋणकोंचा कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर–मर्यादित दायित्व आयडेंटिटी नंबर	U27106PN2005PTC020582
५.	५. नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व प्रधान कार्यालय (काही असल्यास)	कार्यालय क्र. २१५/१६/१७, २ रा मजला, कोहिनूर आर्केड, सेक्टर २४, पुणे – मुंबई मार्ग, टिळक चौक, निगडी, पुणे – ४४, महाराष्ट्र, भारत.
६.	कॉर्पोरेट ऋणकोंच्या संदर्भात दिवाळखोरी प्रारंभ दिनांक	दि. १८.०२.२०२१ (सन्मा. एनसीएलटी यांच्याद्वारे दि. २२.०२.२०२१ रोजी त्यांच्या वेबसाइटवर आदेश प्रसिद्ध)
७.	दिवाळखोरी ठराव प्रक्रिया समाप्तीची अंदाजित दिनांक	दि. १६.०८.२०२१ (सीआयआरपी प्रारंभ दिनांकापासून १८० दिवस)
८.	अंतरिम ठराव अधिकारी म्हणून काम करणाऱ्या इन्सोल्व्हन्सी प्रोफेशनलचे नाव व नोंदणीकरण क्रमांक	श्री. शशांत सुधाकर येवला आयबीबीआय नोंदणीकरण क्र IBBI/IP - P00310/2017-2018/10574
९.	बोर्डवर नोंदणीकृत म्हणून इन्सोल्व्हन्सी प्रोफेशनलचा पत्ता व ई–मेल : नोंदणीकृत पत्ता :	फ्लॅट क्र. ७, इंद्रायणी गणेश नगर, लेखा नगरच्या समोर, आग्रा रोड, नाशिक, महाराष्ट्र –४२२ ००९. ई–मेल: shashantsyeola@gmail.com
१०.	अंतरिम ठराव अधिकाऱ्यासह पत्रव्यवहारासाठी वापरावयाचा पत्ता व ई–मेल	कार्यालय क्र. २०४/बी, २ रा मजला, आदीनाथ शॉपिंग कॉम्प्लेक्स, पुणे–सातारा मार्ग, पुणे–४११०३७. ई–मेल : shashantsyeola@gmail.com
११.	दावे सादरीकरणाची अंतिम तारीख	०३.०३.२०२१
१२.	अंतरिम ठराव अधिकाऱ्यांद्वारे निश्चित अनुच्छेद २१ च्या उप–अनुच्छेद ६ए च्या कलम (बी) अंतर्गत धनकोंचा वर्ग काही असल्यास वर्गाचे नाव	लागू नाही.
१३.	वर्गामध्ये धनकोंचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी नियुक्त परिसमापन अधिकाऱ्यांची नावे (प्रत्येक वर्गाकरिता तीन नावे)	लागू नाही.
१४.	ए) संबंधित फॉर्म व बी) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील जेथे उपलब्ध आहे	वेबलिंक:https://ibbi.gov.in/home/downloads

सूचना याद्वारे देण्यात येत आहे की, राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरणाने, **दि. १८.०२.२०२१ रोजी लीला ट्रेड स्टील अँड कमॉडिटीज इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या** कॉर्पोरेट परिसमापन ठराव प्रक्रिया प्रारंभाचा आदेश दिला. **लीला ट्रेड स्टील अँड कमॉडिटीज इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या** भागधारकांना याद्वारे निर्देश देण्यात येत आहे की, त्यांनी दि. **०३.०३.२०२१** रोजी वा तत्पूर्वीपर्यंत बाब क्र. १० संदर्भातील पत्त्यावर अंतरिम ठराव अधिकाऱ्यांकडे आपल्या दाव्यांचे पुरावे सादर करावेत.

वित्तीय धनकोनी त्यांच्या दाव्यांचे पुरावे केवळ **इलेक्ट्रॉनिक माध्यमातून** सादर करावेत. अन्य सर्व धनको त्यांचे दावे व्यक्तिशः, टपालाद्वारे वा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून त्यांच्या दाव्यांचे पुरावे सादर करू शकतील.

वरील विवरण क्र. १२ अंतर्गत सूचिबद्ध वर्गातील वित्तीय धनकोनी फॉर्म सीएमधील वर्गाच्या अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी विवरण क्र. १३ मध्ये विवरणीत सूचिबद्ध तीन परिसमापन अधिकाऱ्यांतून एकाची निवड करावी.

चुकीचे, दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड होऊ शकेल.

सही/–
अंतरिम ठराव अधिकाऱ्यांचे नाव : **श्री. शशांत सुधाकर येवला**
दिनांक : २४.०२.२०२१
ठिकाण : पुणे

मध्य रेल्वे

ELIMINATION OF MANNED LEVEL CROSSING

ई–निविदा सूचना सं. 03–2021–Sr.DENC, दिनांक 19.02.2021

मंडल रेल्वे प्रबंधक (कार्य), मध्य रेल्वे, सोलापूर, भारत संघच्या राष्ट्रपतींकरिता आणि त्यांच्या वतीने अनुभवी, समर्थ व ख्याति प्राप्त ठेकेदारांकडून खालील कार्यासाठी रेल्वेच्या ई प्रोक्योरमेंट वेबसाईट **www.ireps.gov.in** वर ऑनलाईन ई–निविदा आमंत्रित करीत आहे. **कार्याचे विवरण: Elimination of manned level crossing No. 32 at km. 458/7-8 by providing 2 lanes of 4.5 x 4.5 M RUB at kms. 458/7-8 on Kurduwadi-Miraj section. अनुमानित लागत: ₹** 3,92,21,789.67. **बयाणा रक्कम:** NIL. **निविदा प्रपत्राची किंमत:** NIL. **समापनाची अवधी:** 12 (बारा) महिने. **अनुरक्षण अवधी:** 12 (बारा) महिने. **www.ireps.gov.in या वेबसाईट वर कोटेड टेंडर अपलोड करण्याची शेवटची दिनांक आणि वेळ:** 19.03.2021 ला 15.00 वाजता. **www.ireps.gov.in या वेबसाईट वर टेंडर उघडण्याची दिनांक आणि वेळ:** 19.03.2021 ला 15.45 वाजता. निविदाकारांना निवेदन आहे कि काही बदलाव/शुध्दीपत्रक (जर असेल) साठी website **www.ireps.gov.in** वर टेंडर बंद होण्याच्या तारखेपर्यंत वेळेवर भेट द्या.

IP/SUR/36

रेलमदत हेल्पलाईन 139

जाहीर समन्स

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे सहकारी फेडरेशन लि. पुणे

बारामती विभागीय कार्यालय – मयुरेश्वर अपार्टमेंट, पहिला मजला, भिगवण रोड,
मु.पो. बारामती, ता. बारामती,जि. पुणे
फोन (०२११२) २२९५३२

प्रगती ग्रामीण बिगर शेती सह.पतसंस्था मर्या. निरा
पत्ता जामदार रोड–कसबा
ता.बारामती जि. पुणे
अर्जदार

विरुद्ध

क्र.	प्रतिवादीचे नाव	प्रतिवादी क्रमांक	दावा क्रमांक	दावा रक्कम
१)	श्री. मदने उमेश चंद्रकांत मु.पो. कऱ्हा वागज, ता. बारामती, जि. पुणे	१	११४/२०	५५,८०७/–
२)	श्री. अनिकेत राजकुमार बनकर मु.पो. कऱ्हावागज, ता. बारामती, जि. पुणे	२	११४/२०	५५,८०७/–
३)	श्री. अजित बाळासो जाधव मु.पो. कऱ्हावागज ता. बारामती, जि. पुणे	३	११४/२०	५५,८०७/–
४)	सौ. रेश्मा उमेश मदने मु.पो. कऱ्हावागज ता. बारामती, जि. पुणे	४	११४/२०	५५,८०७/–
५)	सौ. वैशाली राजेंद्र तावरे मु.पो. तावरे वस्ती, म्हसोबावाडी, ता.इंदापूर, जि.पुणे	१	१०२/२०	६७,५१०/–
६)	श्री. किसन दत्तु क्षिरसागर साईनगर–पानसरे चाळ, रुई, ता.बारामती	२	१०२/२०	६७,५१०/–
७)	श्री. वाघमारे बाळासाहेब रुपचंद अशोकनगर– इंदापूर रोड, भवानीनगर, ता. इंदापूर	१	१०१/२०	७६,१५३/–
८)	श्री. म्हेत्रे वैभव पोपट टी.सी. कॉलेज रोड, मिशन कंपौंड, बारामती	३	९३/२०	७६,०८३/–
९)	सुषमा सुभाष टेंबरे बहिरमल बिल्डींग, सुभाष चौक, बारामती	३	१०९/२०	६३,९६६/–
१०)	मनोहर शंकर खराडे मु.पो. लाटे ता. बारामती, जि. पुणे	१	१११/२०	४,६०,९९८/–
११)	सचिन जवाहरलाल खलाटे मु.पो. लाटे ता. बारामती, जि. पुणे	२	१११/२०	४,६०,९९८/–
१२)	श्री. शंकर आनंदराव खराडे मु.पो. लाटे ता. बारामती, जि. पुणे	४	१११/२०	४,६०,९९८/–
१३)	ऐश्वर्या शरद मोरे देवळे इस्टेट गुणवडी रोड, बारामती	१	१०५/२०	४८,६३४/–
१४)	सतिश मारुती मोरे सई फोटो स्टडिओ गुणवडी रोड, बारामती	२	१०५/२०	४८,६३४/–
१५)	मोरे शरद बापुराव गुणवडी रोड, देवळे इस्टेट, बारामती	३	१०५/२०	४८,६३४/–
१६)	संतोष गोकुळदास गुंदेचा मार्केट यार्ड, बारामती, जि. पुणे	१	९०/२०	५०,७०१/–
१७)	रोहित राजेंद्र नेवसे मु.पो. वडगांव निंबाळकर, ता. बारामती	३	९०/२०	५०,७०१/–
१८)	प्रसाद बाळु अहिवळे सटवाजीनगर, बारामती, जि.पुणे	१	९२/२०	५८,८५३/–
१९)	अहिवळे राजेंद्र सोपाना मोतीबाग–इंदापूर रोड, बारामती	२	९२/२०	५८,८५३/–
२०)	प्रकाश रामचंद्र केंगार मु.पो. आंबेडकर ,स्टेडियम जवळ, बारामती	३	९२/२०	५८,८५३/–
२१)	संजय दत्तात्रय नारायणकर मु.पो. जळगांव क.प. ता. बारामती, जि.पुणे	१	११०/२०	६६,४१९/–
२२)	अशोक गोरखनाथ खुडे मु.पो. माळेगांव बु.।। वॉर्ड क्र.२, ता.बारामती,जि.पुणे	२	११०/२०	६६,४१९/–
२३)	गायकवाड चंद्रकांत लक्ष्मण मु.पो. लोणी देवकर ता. इंदापूर	२	९५/२०	६३,६४४/–
२४)	किसन दत्तु क्षिरसागर मु.पो.साईनगर, रुई, ता. बारामती	३	९५/२०	६३,६४४/–
२५)	अनिल रामचंद्र देवकाते मु.पो. स्वागत हॉटेल, इंदापूर चौक, बारामती	१	१०३/२०	३,७९,१७५/–
२६)	शेख कदिर बाबालाल सटवाजीनगर, बारामती, जि.पुणे	२	१०३/२०	३,७९,१७५/–
२७)	विजय रामचंद्र देवकाते मु.पो. स्वागत हॉटेल, इंदापूर चौक, बारामती	४	१०३/२०	३,७९,१७५/–
२८)	चंद्रकांत लक्ष्मण गायकवाड मु.पो. देवकर लोणी, ता. इंदापूर, जि.पुणे	२	९४/२०	६९,६६४/–
२९)	किसन दत्तु क्षिरसागर पानसरे चाळ, साईनगर, रुई, ता. बारामती	३	९४/२०	६९,६६४/–
३०)	बाबासाहेब रुपचंद वाघमारे मु. अशोकनगर, भवानीनगर, ता.बारामती	३	९९/२०	७६,१५३/–
३१)	अशोक अंबादास झेंडे मु.पो. बऱ्हाणपुर ता.बारामती, जि.पुणे	१	९७/२०	५०,६६०/–
३२)	कृष्णा त्रिंबक पवार बी–११,संघवी रेसिडेन्सी, भिगवण रोड, बारामती	२	९७/२०	५०,६६०/–
३३)	वैभव पोपट म्हेत्रे मिशन कंपौंड, वसंतनगर, बारामती	३	१००/२०	७१,७७४/–
३४)	शरद बापुराव मोरे देशपांडे इस्टेट–हरिकृपानगर, बारामती	१	१०६/२०	४२,७१४/–

सदर दाव्याचे कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील प्रतिवादींना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतु प्रतिवादी यांना समन्स रुजू न झाल्याने/ त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने जाहीर समन्स देत आहोत. उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दिनांक २६ फेब्रु.२०२१ रोजी ११.३० वाजता दाव्यासंबधी कागदपत्रांसह आपण या न्यायालयात हजर रहावे.

या नोटीशीद्वारे उपरोक्त प्रतिवादी यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल. म्हणून आज दिनांक ५ फेब्रु. २०२१ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हा जाहीर समन्स दिला आहे.

शिक्का

सही/–
(श्रीमती रुपाली माने)
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे
सहकारी फेडरेशन, लि., पुणे